जाहीर नोटीस

तमाम विक्रेतेदार यांस याद्वारे कळविणेत येते की, जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग येथिल कार्यालयाच्या उपयोगासाठी एक इंडक्शन शेगडी भांडयांसहीत खरेदी करावयाची आहे. याकरीता दरपत्रके मागविणेत येत आहेत.

अटी व शर्ती

१) दरपत्रक आवश्यक त्या संपूर्ण तपशिलासह, तारखेसहीत, बंद लखोटयामधून मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सिंधुदुर्ग यांचे नांवे असावे. सदर लखोटयावर **"इंडक्शन शेगडी खरेदी करणेकरीता दरपत्रक"** असा उल्लेख करणेत यावा.

२) दरपत्रक सादर करणा-या विक्रेत्यांची वस्तू व सेवा करारांतर्गत नोंदणी असणे आवश्यक आहे.

३) दरपत्रकामध्ये SGST/CGST क्रमांक नमुद करावा. तसेच कार्यालयीन दस्तऐवजी तयार करणेसाठी दुकानाचे लायसन्स, पॅनकार्ड, आधारकार्ड, बँक पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत व रद्द केलेला धनादेश दरपत्रकासोबत जोडणे आवश्यक आहे.

४) दरपत्रकामध्ये इंडक्शन शेगडीबाबत व भांडयांबाबतचे सविस्तर वर्णन उदा. शेगडीच्या कंपनीचे वर्णन व सोबत भांडयांची संख्या नमूद करावे. वस्तूच्या दर्जाबाबत खात्री विक्रेत्यांनी दयावयाची आहे.

५) खरेदी करणेत आलेली इंडक्शन शेगडी जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग यांचे कार्यालयात पोहोच करणेची जबाबदारी संबंधित विक्रेत्यांची राहील.

६) जाहीर नोटीसीमध्ये दिलेल्या मुदतीनंतर आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

७) सर्वात कमी दराचे दरपत्रक ज्यांचे असेल त्यांचे दरपत्रकाचा विचार करणेत येईल. दरपत्रकामध्ये खाडाखोड करणेत येवू नये.

८) अपवादात्मक परिस्थितीत दरपत्रक नाकारण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सिंधुदुर्ग यांचा राहील.

तरी, इच्छुक विक्रेत्यांनी आपली दरपत्रके **दि.३१/१०/२०२५** पर्यंत या कार्यालयाकडे सादर करावीत.

दिनांकः- १३/१०/२०२५

13/10/25

सहाय्यक अधीक्षक(वित्त)
जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग

म.जा.क्र.ग्रंथा./५६६३ सन २०२५
जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग–ओरोस
दिनांकः–१३/१०/२०२५

प्रत माहितीसाठी व जरुरत्या कार्यवाहीसाठी सविनय सादर–

१. मा. दिवाणी न्यायाधीश(व.स्तर), सिंधुदुर्ग–ओरोस (ई–मेल द्वारे)
२. मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, सिंधुदुर्ग–ओरोस (ई–मेल द्वारे)
३. मा. सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सिंधुदुर्ग–ओरोस (ई–मेल द्वारे)
४. मा. दिवाणी न्यायाधीश(क.स्तर), कुडाळ, वेंगुर्ला, सावंतवाडी, मालवण, कणकवली, देवगड, दोडामार्ग (ई–मेल द्वारे)
५. मा. जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग–ओरोस (ई–मेल द्वारे)
६. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग–ओरोस (ई–मेल द्वारे)
७. मा. जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग–ओरोस यांचे नोटीस बोर्डवर तसेच संकेतस्थळावर
८. डी.एस.ए. , जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग यांचेकडे जिल्हा न्यायालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता